ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 7 | MARCH - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ‘भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या वैयक्तिक सत्याग्रहात पश्चिम महाराष्ट्रातील महिलांचे योगदान’



**डॉ. अमृत निंबा वळवी**
(इतिहास विभाग) गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नगांव, ता.जि.धुळे. महाराष्ट्र.

**प्रस्तावना :-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचे योगदान फार मोठे आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या वैयक्तिक सत्याग्रहात पश्चिम महाराष्ट्रातील स्त्रियांचे योगदान फार महत्वाचे आहे. ०३ सप्टेंबर १९३९ रोजी भारताचे तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी जाहिर केले होते की, भारत दुसऱ्या जागतिक महायुध्दात सहभागी आहे. परंतु या घोषणेच्या अगोदर त्यांनी भारतातील कोणत्याही राजकीय पक्षाशी अथवा नेत्यांशी कोणत्याही प्रकारची चर्चा केली नाही. त्यामुळे कॉंग्रेस पक्ष असंतुष्ट झाला होता. ब्रिटीश सरकारने एकतर्फी निर्णय घेतल्यामुळे राष्ट्रपिता महात्मा गांधींजीनी इंग्रज सरकारच्या युध्द धोरणाचा विरोध करण्यासाठी इ.स. १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रह सुरु केला.

वैयक्तिक सत्याग्रह सुरु करण्याचे महत्वाचे कारण म्हणजे ऑगस्ट ऑफर आणि दुसरे जागतिक महायुध्दात भारताला सहभागी केल्यामुळे इंग्रज सरकारचा विरोध करण्यासाठी युध्द विरोधी वैयक्तिक सत्याग्रह सुरु करण्यात आला. वैयक्तिक सत्याग्रह इ.स.१९४० ते १९४२ पर्यत भारतात अनेक ठिकाणी निर्देशने, हरताळ करुन ब्रिटीश सरकारच्या धोरणाला तिव्रपणे विरोध केला गेला. या सत्याग्रहात पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापुर, सोलापुर, नाशिक आणि अहमदनगर या जिल्ह्यातील स्त्रियांनी उत्सुर्तपणे युध्द विरोधी वैयक्तिक सत्याग्रहात सहभाग घेऊन भारतीय स्वातंत्र लढ्यात महत्वाचे योगदान दिले.

**उद्देश —**

१) भारतीय स्वातंत्र लढ्याच्या सत्याग्रहात पश्चिम महाराष्ट्रातील स्त्रियांचा योगदानाचा अभ्यास करणे.
२) युध्द विरोधी वैयक्तिक सत्याग्रहात पश्चिम महाराष्ट्रातील स्त्रियांचे कार्य उजेळात आणणे.

**गृहितके —**

१) भारती स्वातंत्र लढ्याच्या सत्याग्रहात पश्चिम महाराष्ट्रातील स्त्रियांचे योगदान मोठे आहे.
२) वैयक्तिक सत्याग्रहात पश्चिम महाराष्ट्रातील स्त्रायांचे योगदान फार मोठ्या प्रमणात दिसून येते.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या विषयाशी निगडीत शोध निबंधातील विवेचन दुय्यम स्त्रौतांवर अवलंबून आहे यासाठी संदर्भग्रंभ म्हणून जिल्हा गॅझेटियर, देशभक्त कोश, स्वातंत्र्य सैनिक कोश, चरित्रकोश, मासिके, वर्तमानपत्रातील लेख इत्यादी साधनांचा आधार घेतलेला आहे.

## वैयक्तिक सत्याग्रहात सहभागी असलेल्या महाराष्ट्रातील स्त्रिया :-

### उंडाळकर पिलूताई नरहर :-

स्वातंत्रसैनिक श्रीमती पिलूताई नरहर उंडाळकर यांचा जन्म इ. स. १९१८ साली रेठरे ता. व जि. सातारा या गावी झाला. त्यांचे शिक्षण मराठी सहाव्या इयत्ते पर्यंत झाले होते. इ.स. १९४०-४१ साली वैयक्तिक सत्याग्रहात त्या सहभागी झाल्या होत्या. त्याबद्दल ब्रिटिश सरकारने इ.स. १९४३ मध्ये त्यांना तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा आणि चाळीस रुपये दंड ठोठावला होता. स्वातंत्र्य चळवळीतील योगदानामुळे त्यांना शासनाकडून सन्मानपत्र देण्यात आले.

### गुरव लक्ष्मीबाई शंकर :-

स्वातंत्र्यसैनिक श्रीमती लक्ष्मीबाई शंकर गुरव यांचा जन्म चिंचणे ता. चांदवड जि. कोल्हापूर या गावी झाला. त्यांचे शिक्षण मराठी दुसऱ्या इयत्तेपर्यंत झाले होते. २६ जानेवारी १९४२ रोजी सत्याग्रह केल्याबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांना एक महिना साध्या कैदेची शिक्षा सुनावली होती."

### प्रभू सीताबाई रामकृष्ण :-

स्वातंत्र्यसैनिक सिताबाई रामकृष्ण प्रभू यांचा जन्म इ.स. १९१९ साली तुर्केवाडी ता. चांदवड जि. कोल्हापूर या गावी झाला. ब्रिटिश सरकारच्या ऑगस्ट ऑफ जागतिक दुसरे महायुद्ध सहभाग धोरणाविषयी त्यांनी १९४० साली केला. तसेच इ.स. १९४२ च्या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये सहभाग घेतल्यामुळे बिटिश सरकारने एकूण चौदा महिने सक्तमजुरीची शिष्या ठोठावली.

### शेटे किसनबाई जयराम

स्वातंत्र्य सैनिक श्रीमती किसनबाई जयराम यांचा जन्म. १९२१ साली कोल्हापुर ता. करवीर, जि. कोल्हापूर या गावी झाला. ब्रिटिश सरकारने भारतीयांशी विचारविनिमय न करता भारताला दुसऱ्या महायुध्दात सहभागी असल्याचे जाहीर केले. ब्रिटिशांच्या या धोरणाचा निषेध करण्यासाठी श्रीमती किसनताईनी इ.स. १९४२ साली रेसिडेंट कचेरीवर सत्याग्रह केला. त्याबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांना दहा दिवस सक्तमजुरी व पंचवीस रुपये दंड अशी शिक्षा सुनावली होती.

### गुजराती (मेहता) ताराबेन घनः श्याम

स्वातंत्र्यसैनिक ताराबेन घनश्याम गुजराती (मेहता) यांचा जन्म १८९८ साली पुणे ता. व जि. पुणे येथे झाला. त्यांचे शिक्षण मराठी तिसऱ्या इयत्तेपर्यंत झाले होते. ब्रिटिशः सरकारने भारतीयाशी सल्लामसलत न करता जागतिक दुसऱ्या महायुद्धात भारतीयांचा सहभाग असल्याचे एकतर्फी जाहीर केले होते. इंग्रज सरकारच्या या धोरणाविरोधी श्रीमती ताराबेन घनश्याम यांनी इ. स. १९४१ मध्ये नंदुरबार शहरात पहिला वैयक्तिक सत्याग्रह केला. त्याबद्दल शंभर रुपये दंड व एक दिवसाची सजा अगर दंड न भरल्यास तीन महिन्यांची साधी कैद अशी शिक्षा सुनावण्यात आली होती.

### धडपडे सिंधुबाई जगन्नाथ

स्वातंत्र्यसैनिक सिधुबाई जगन्नाथ यांचा जन्म इ. स. १९०९ मध्ये हैदराबाद येथे झाला. त्यांचे वास्तव्य पुणे येथे राहिले. त्यांचे शिक्षण इंग्रजी चौथ्या इयत्तेपर्यंत झाले होते. त्यानी इ. स. १९४२ साली डोडा सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल त्यांना सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली होती.

### पोंढे सी. सहिबाई शिवनाथ :-

स्वातंत्र्य सैनिक श्रीमती सहिबाई शिवनाथ पोंदे यांचा जन्म इ.स. १९४२ साली झाला. त्यांचे मूळ गाव जुन्नर जिल्हा पुणे हे होय. त्यांचे शिक्षण मराठी सातव्या इयत्तेपर्यंत झाले होते. ब्रिटिश सरकारच्या धोरणा विरोधी इ. स.१९४०-४१ सालच्या वैयक्तिक सत्याग्रहात सहभाग घेतला. ब्रिटिश सरकारने १९४१ साली त्यांच्यावर दोन खटले व एकूण पंधरा दिवस कैद व सव्वा रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली होती.

याबरोबरच इ. स. १९३९ ते ४२ सालच्या दरम्यान महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात वैयक्तिक सत्याग्रहात स्त्रीयांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये स्वातंत्र्यसैनिक श्रीमती इंदिराबाई शंकर धामणकर मुळगाव चाफळ, ता. जि. सातारा, श्रीमती चपावतीबाई बंसीलाल भट्ट मूळगाव सातारा ता. जि. सातारा, श्रीमती सत्यवती रघुनाथ लिमये मुळगाव मसूर ता. कराड, जि. सातारा, श्रीमती वैजयंती विठ्ठल हडप मूळ गाव सातारा, ता. जि. सातारा, श्रीमती सुलोचना रामचंद्र जोशी मुळगाव आदळे, ता. शिराळा, जि. सांगली, श्रीमती सोनूताई अच्युत देशपांडे मुळगाव वाळया ता. वाळ्या जि. सांगली, श्रीमती मुक्ताबाई बंडू नाटकर, मुळगाव बिल्वशी, ता. शिराळा जि. सांगली, श्रीमती गंगूबाई भिमाजी किनरे जन्मगाव कोळीकेरी ता. हुकेरी जि. बेळगाव, श्रीमती मीनाक्षी गोविंद साने वास्तव्य सोलापूर ता. जि. सोलापूर, श्रीमती देसाई जयाबेन गुलाबराव वास्तव्य मुंबई (ओलपाड-गुजरात) वैयक्तिक सत्याग्रह केला. त्यामुळे सहा महिने शिक्षा सुनावण्यात आली.

## श्रीमती जानकीबाई आपटे (१८९६-१९६२)

श्रीमती जानकीबाई आपटे यांचा जन्म २३ ऑगस्ट १८१६ रोजी पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथील दाते कुटुंबात झाला. बालपणीच त्यांच्या मनावर देशभक्ती वातावरणाचा प्रभाव पडलेला होता. त्यांचा विवाह अहमदनगर येथील सोसायटी हायस्कूलमधील माध्यमिक शिक्षक परशूराम सदाशिव आपटे यांच्याशी झाला.

दुसरे महायुद्धातील ब्रिटिश धोरणाचा विरोध करण्यासाठी नगर जिल्हा सत्याग्रह समितीचे अध्यक्ष म्हणून थोर देशभक्त अच्युतराव पटवर्धन यांची निवड करण्यात आली होती. मात्र त्यांना अटक करून ब्रिटिश सरकारने पंधरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली होती. त्यामुळे त्यांच्या जागेवर सत्याग्रही प्रमुख म्हणून श्रीमती जानकीबाई आपटे यांची निवड करण्यात आली. याच सुमारास पुढे डिसेंबर १९४० च्या अखेर अहमदनगर जिल्ह्यातील पहिल्या स्त्री सत्याग्रही म्हणून जानकीबाई आपटे यांची निवड करण्यात आली. तसेच त्यांच्या खास सहकारी श्रीमती फातिमा शेख यांची पहिल्या मुस्लिम सत्याग्रही म्हणून तर पहिल्या खिश्चन महिला सत्याग्रही म्हणून श्रीमती ताईबाई राठोड यांची निवड करण्यात आली.

८ जानेवारी १९४१ रोजी नगर शहरातील काँग्रेस कचेरीजवळ संध्याकाळी सुमारे ठिक ५:३० वाजता श्रीमती जानकीबाई यांनी ब्रिटिश सरकारच्या युद्धविरोधी घोषणा देऊन सत्याग्रहाचा प्रारंभ केला. त्यांनी आपल्या जोरदार आवाजात सरकारच्या विरोधी घोषणा दिल्या. या युद्धाला कपडे देऊ नका, माणसे देऊ नका, पैसे देऊ नका, अशा घोषणा देत नगर शहरातील अनेक रस्त्यारस्त्यातून अनेक ठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्या. असे वर्णन ज्येष्ठ नेते बाळासाहेब भारदे यानी केले आहे. या मिरवणुकीमध्ये त्यांच्यासोबत जवळपास दोन हजार लोक सहभागी झाले होते. सामान्य जनतेतील प्रक्षोभ लक्षात घेऊन पोलिसांनी संपूर्ण मिरवणूक पार पडेपर्यंत अटक करण्याचे टाळले होते. दुसऱ्या दिवशी त्यांच्या घरी जाऊन भारत संरक्षण कायद्याखाली वारंट दाखवून श्रीमती जानकीबाई यांना अटक करण्यात आली. त्यांना एक दिवस कैद व दोनशे रुपये दंड अथवा तीन महिने साधी कैद अशी शिक्षा फर्मावली होती. दंड न भरता त्यांनी तीन महिन्याची कारावासाची शिक्षा भोगली.

## निष्कर्ष :

१९३९ मध्ये जागतिक दुसरे महायुद्ध युरोप खंडामध्ये सुरू झाले. याच दरम्यान भारतीयांचे व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी भारतीय नेत्यांशी विचारविनिमय न करता भारत युद्धातमध्ये सहभागी झाल्याची एकतर्फी घोषणा केली होती. ब्रिटिश सरकारच्या या कुटनीतीविरुद्ध भारतीय जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता. अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी महात्मा गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली. या युद्धविरोधी वैयक्तिक सत्याग्रहात पश्चिम महाराष्ट्रातील स्त्रियांनीही उस्फूर्तपणे सहभाग घेऊन युद्धविरोधी घोषणा दिल्या. त्यांचे हे कार्य अतिशय मोलाचे आहे. स्वात्रंत्र्य चळवळीच्या वैयक्तिक सत्याग्रहात त्यांचे हे कार्य भारतीय महिलांसाठी सतत प्रेरणादायी ठरेल.

## संदर्भग्रंथ :-

१) दत्त रजनी पाम, देवघर य. ना. (अनुवादक) आजकालचा भारत, (India Today) प्रकाशक डायमंड पब्लिकेशन शंकर प्रसाद, सदाशिव पेठ, पुणे, मराठी प्रथम आवृत्ती, २००६.
२) कुलकर्णी सुमित्रा गांधी, - महात्मा गांधी मेरे पितामह (व्यक्तित्व और परिवार) खंड-१, प्रकाशक : दरियागंज, नवी दिल्ली, संस्करण-२०१०

३) फडके य. दि. — विसाव्या शतकातील महाराष्ट्र, राजकीय इतिहास, खंड पाचवा, १९४० ते १९४७, के सागर पब्लिकेशन्स, शनिवार पेठ पुणे, द्वितिय आवृत्ती-२००८
४) जोशी एस. एम., - मी अेस. एम. आत्मकथा, प्रकाशक कॉन्टिनेन्टल, प्रकाशन पुणे-१९८४
५) कुंटे भ. ग., - स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य, पश्चिम विभाग — खंड-३ प्रकाशक कार्यकारी संचालक व सचिव, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई-१९८०
६) शहासने चंद्रकांत — देशभक्त कोश, प्रकाशन : बहुजन साहित्य धारा, पुणे, प्रथम आवृत्ती — २०१२.
७) आपटे भा. प., कर्मयोगी जानकीबाई आपटे, श्री. विद्या प्रकाशन, पुणे दुसरी आवृत्ती-२००३
८) पवार उर्मिला आणि मुन मिनाक्षी, - आम्हीही इतिहास घडवला, - श्री उवाच प्रकाशन, मुंबई-१९८९
९) मोदी नवाझ ब (संपादक), फडके वासंती (अनुवाद) — भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रिया, प्रकाशन : मेहता पब्लिशिंग-हाऊस, सदाशिव पेठ, पुणे प्रथमावृत्ती-२००३
१०) पवार बा. ग. — क्रांतिसिंह नाना पाटील, प्रतिसरकारचा रोमांचकारी इतिहास, प्राकशक : मातृभूमी प्रकाशन, पुणे — प्रथमावृत्ती-२००१
११) खोबरेकर वि. गो., - इंग्रजी सत्तेविरुध्द महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव — १८१८-१९६०, प्रकाशक : पॉप्युलकर बुक डेपो, मुंबई-१९५९
१२) मोरे दिनेश, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास.